# 'टार्गेट' इंग्रजी पुस्तकाची मराठी आवृत्ती प्रकाशित

**पुणे, १७ सप्टेंबर ▶▶**

अत्यंत कमी आणि केवळ आपल्या बौद्धिक कौशल्याने देश-विदेशात-वैश्विक दर्जाची उत्कृष्ट बाजारपेठ निर्माण करून भारताला जगाच्या नकाशावर मानाचे स्थान प्राप्त करून देणाऱ्या नवउद्योजक जिग्नेश शाहांच्या विजयरथाला कुटील राजकीय कारस्थान व हीन दर्जाच्या षड्यंत्राने कसे उध्वस्त करण्यात आले याची पुराव्यासहित तपशीलवार गाथाच वरिष्ठ पत्रकार शांतनु गुहारे यांनी आपल्या 'द टार्गेट' या पुस्तकात मांडली आहे.




या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीने अगोदरच ॲमेझॉनवर 'बिझनेस व ईकॉनॉमी' श्रेणीत केवळ ९० दिवसात विक्री करून प्रथम क्रमांक पटकाविला व पाठोपाठ आलेली गुजराती आवृत्ती तर केवळ २५ दिवसात नंबर १ ठरली. इतकेच नव्हे तर देशातील क्रॉसवर्ड या अग्रगण्य ग्रंथदालनांमध्येही हे पुस्तक नंबर १ बेस्टसेलर ठरले.

◀(तभा वृत्तसेवा)